## शाळेचे हस्तांतरण

शासन मान्यताप्राप्त शाळा चालवीणे व्यवस्थापनास विविध कारणामुळे अशक्य होत असल्यास अशा मान्यताप्राप्त शाळेचे हस्तांतरण सदर संस्था अन्य सक्षम संस्थेस विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या परवानगीने करु शकते.

विभागीय शिक्षण उपसंचालक याबाबत दोन्ही संस्थांचे प्रस्ताव पडताळणी करुन तसेच हस्तांतरणाच्या कारणांची तपासणी करुन अन्य सक्षम संस्थेस अशी शाळा हस्तांतरण करण्यांस माध्यमिक शाळा संहिता १९७९ मधील नियम क्रमांक १२.३ नुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार परवानगी देतात.

शाळेचे हस्तांतरण करण्यासाठी प्रथमतः क्षेत्रीय अधिकारी (संबंधित शिक्षणाधिकारी ) यांच्याकडून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह/ प्रमाणपत्रांसह प्रस्ताव शिफारशीस विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर होणे आवश्यक आहे. हस्तांतरणासाठी लागणा-या कागदपत्रांची/ प्रमाणपत्रांची यादी खालीलप्रमाणे :-

## आवश्यक कागदपत्रे

१. दोन्ही संस्थांचे ठराव (सर्वसाधारण सभेचे)
२. दोन्ही संस्थाचे करारपत्रक त्यात खालील बाबींचा समावेश असावा (स्टॅम्प पेपरवर)
    १. मूळ संस्थेची मालमत्ता कोणाकडे ठेवण्यात येणार आहे व कोणत्या अटींवर
    २. संस्था हस्तांतरणाची कारणे कोणती
    ३. संस्थांच्या आर्थिक व्यवहाराबाबत
    ४. संस्थेच्या कर्मचारी वर्गाबाबत वेतन शासन नियमाप्रमाणे देणे, सेवाज्येष्ठता इ. बाबत
    ५. विहित पात्रतेचे कर्मचारी नेमण्याबाबत
    ६. शाळेस नवीन संस्था पुरेशा भौतिक सुविधा पुरविल्याबाबत
    ७. विद्यार्थी प्रवेशासाठी देणगी देण्यांत येणार नसल्याबाबत
    ८. शासनाचे/ खात्याचे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश नवीन संस्था पाळील याबाबत
    ९. ज्या अटींवर जुन्या संस्थेस परवानगी दिलेली आहे त्यास नवीन संस्थेकडे शाळा गेल्यानंतर बदल होणार नाही
    १०. नवीन संस्थेत कोणतेही वाद नसल्याची हमी.
३. मा. धर्मादाय आयुक्त यांचे नाहरकत प्रमाणपत्र
४. शाळेच्या परवानगी पत्रांची/ मान्यता पत्राची प्रत
५. कर्मचा-यांचे संमतीपत्र
६. मा. शाळा. संहिता १२.१ ते १२.५ प्रमाणे पुर्तता व ३ महिन्यांची नोटीस
७. नवीन व जुन्या संस्थेची घटना व कार्यकारी मंडळाची यादी
८. संस्था रजिस्टेशन सर्टिफिकेट नवी व जुनी संस्था
९. नवीन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणारा कागदपत्रे
१०. नवीन संस्थेमार्फत अन्य शाळा चालविण्यांत येत असतील तर त्यांची पुर्ण पत्त्यांसह यादी
११. नवीन संस्थेमार्फत चालविण्यांत येणा-या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली आहे काय ? किंवा सदर संस्थेबाबत तक्रारी आहेत काय ? याबाबत शिक्षणाधिकारी यांचे स्पष्ट अभिप्राय
१२. शाळा हस्तांतरणाबाबत शिक्षणाधिकारी यांची स्पष्ट शिफारस
१३. सध्याची शाळेची वर्गवार विद्यार्थी संख्या व कर्मचारी संख्या (यादी)
१४.शाळेचा वार्षिक तपासणी अहवाल.